THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 8TH OCTOBER 1896.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं दिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख १० माहे सप्टेंबर सन १८९६ रोजीं मंजूर केला, तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असेः—

### सन १८९६ चा आक्ट १५ वा.

**सन १८७९ चा शेंबा व गर यांबाबदचा आक्ट सुधारण्याविषयीं आक्ट.**

ज्याअर्थी सन १८७९ चा शेंबा व गर यांबाबदचा आक्ट जास्त सुधारणें योग्य आहे, त्याअर्थी यावरून खालीलप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :

*सन १८७९ चा आक्ट २०, याच्या १ ल्या कलमाची सुधारणा.*

१. सन १८८६ च्या २४ व्या आक्टावरून सुधारलेल्या सदरहू आक्टाच्या १ ल्या कलमांतील "मद्रासचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या व बंगालचे लेफ्टेनंट गव्हर्नर यांच्या वहिवाटींतील मुलूक खेरीज करून" हे शब्द रद्द केले आहेत.

*सन १८७९ चा आक्ट २०, याच्या ७ व्या व ८ व्या कलमाची सुधारणा.*

२. सदरहू आक्टाचें कलम ७ याच्या शेवटीं "मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, असा इन्स्पेक्टर हा याप्रमाणें नेमलेला व्हेटिरिनरी प्राक्टिशनरही असेल, तेव्हां त्याला अशी तपासणी स्वतः करतां येईल" हा मजकूर जास्त दाखल केला पाहिजे, आणि कलमें ७ व ८ यांमध्यें "सर्जन" हा शब्द आला असेल त्या दरेक ठिकाणीं त्याबद्दल "प्राक्टिशनर" हा शब्द दाखल केला पाहिजे.

*सन १८७९ चा आक्ट २०, यांत जास्त कलम दाखल करणें.*

३. सन १८९१ चा कायदे रद्द करण्याबाबद व सुधारण्याबाबद आक्ट यावरून सुधारलेल्या सदरहू आक्टाच्या शेवटीं खालील कलम जास्त दाखल केलें पाहिजे. तें येणेंप्रमाणें :

*एकाच मनुष्यास, इन्स्पेक्टर व व्हेटिरिनरी प्राक्टिशनर, या दोन्ही हुद्यांवर नेमणें.*

"१९. स्थानिक सरकाराला, या आक्टाच्या किंवा त्या खालील कोणत्याही कानूच्या कारणांपैकीं सर्व किंवा कोणत्याही कारणाकरितां, कोणत्याही व्हेटिरिनरी प्राक्टिशनरास इन्स्पेक्टर व व्हेटिरिनरी प्राक्टिशनर या दोन्ही हुद्यांवर नेमतां येईल."

एस्. हार्व्हे जेम्स,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True translation)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख १० माहे सप्टेंबर सन १८९६ रोजीं मंजूर केला, तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असेः

---

## सन १८९६ चा आक्ट १६ वा.

---

### हिंदुस्थानचा सन १८६६ चा पोस्ट आफिसाचा आक्ट सुधारण्याबाबद आक्ट.

ज्याअर्थीं हिंदुस्थानचा सन १८६६ चा पोस्ट आफिसाचा आक्ट सुधारणें योग्य आहे; त्याअर्थीं यावरून खालीलप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे:—

सन १८६६ चा आक्ट १४, कलम ६६, याच्यानंतर नवीन कलम दाखल करणें.

१. सन १८९९ च्या ३ ऱ्या आक्टाच्या ७ व्या कलमावरून सुधारलेल्या सदर्हू आक्टाच्या ६६ व्या कलमानंतर खालील कलम दाखल केलें पाहिजे. तें येणेंप्रमाणें:

पोस्टाच्या अधिकाऱ्यांनीं भरलेली कस्टमची ड्यूटी वसूल करण्याबाबद.

"६७. ज्या पत्रावर, पार्सेलावर किंवा इतर जिनसावर कोणतीहि कस्टमची ड्यूटी भरावयाची असेल असें पत्र, पार्सेल किंवा इतर जिनस ब्रिटिश हिंदुस्थानच्या हद्दींबाहेरील कोणत्याहि ठिकाणाहून आला असून अशी ड्यूटी कोणत्याहि कस्टमच्या बंदरीं किंवा इतर ठिकाणीं पोस्टाच्या अधिकाऱ्यांनीं भरली असेल तेव्हां अशा ड्यूटीची रकम, ह्या आक्टाअन्वयें पोस्टाचें हाशील ज्या रीतीनें वसूल करण्याचा अधिकार आहे त्याच रीतीनें, वसूल केली पाहिजे."

(सही) एच्. हार्वे जेम्स,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True translation)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.